# राशिभविष्य- जानेवारी, २०१२.

**दामले दादा (dadadamle@hotmail.com )**

**इ.सन २०१२ हे वर्ष आपणां सर्वांस आरोग्यसंपन्नतेचे व सुखशांतीचे जावो !**

==============================================================

**(१) मेष-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात ग्रहमान बरेचसे प्रतिकुल असून केवळ महिन्याच्या उत्तरार्धात रवि आणि बुध-शुक्र काही प्रमाणात अनुकुल होतीलसे दिसते. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सावधानतेचे आचरण करावे, हे उत्तम. मंगळ-गुरु शुभ योगामुळे या राशीची मंडळी कोणत्याही परिस्थितीत आनंदी, उत्साही, राहून सतत प्रयत्नशील राहू शकतील. शनि-मंगळ लाभयोगामुळे या राशीच्या मंडळींना जिद्दीने काम करण्याची धमक उत्पन्न होईल व त्यात शनीच्या विचारीपणा व संयम या गुणांचा उपयोगही होईल. महिन्याच्याया राशीच्या मंडळींना उत्तरार्धात शनि-शुक्र शुभ असला तरी या योगामुळे दोन्ही ग्रहांच्या विरोधी गुणधर्मामुळे सतत मनाची कुचंबणा व भावनांचा कोंडमारा होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या स्त्रियांमध्ये या योगामुळे सोशिकपणा व इतरांसाठी कष्ट व त्याग करण्याची वृत्ती निर्माण होईल. शुक्र व शनि एकमेकांचे मित्र असल्याने या राशीच्या मंडळींच्या उद्योग-व्यवसायात स्थिरता निर्माण होईल. शुक्र-गुरु शुभ योगामुळे या राशीच्या लेखकांच्या लेखनात एक विशिष्ट प्रकारचे लालित्य निर्माण होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना काळ अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. पण पूर्वार्धात मात्र मानसिक ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. संततिसुखाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असेल. मुलांचे मनाविरुद्ध व तापदायक आचरण, आजार यांमुळे अस्वस्थता वाटेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नेपच्यून-हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच असून चिंता व मनस्ताप देणारे असेच सिद्ध होतील. या राशीच्या काही मंडळींना जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. या राशीच्या मंडळींना सहज रीत्या वाम मार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी कटक्षाने तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. श्रद्धा असल्यास गणेश व गुरु दत्तात्रेय यांची उपासना अनुकुल होईल.

(२) वृषभ - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि, मंगळ, राहू व काही प्रमाणात शुक्र हे चार ग्रह बऱ्याच प्रमाणात प्रतिकुल होतीलसे दिसते. शारीरिक अनारोग्य व त्यातच मनस्ताप. मानसिक ताण सहन करावा लागेलसे दिसते. मंगळामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, गैरसमज, कौटुंबिक भांडणे, असमाधानकारक घटना, राहत्या जागेसंबंधी त्रास वा स्थावर संपतीबाबत कटकटी सहन कराव्या लागतील. शनि नोकरी-व्यवसायास पूरक

असला तरी दिनांक १६-१७ या दोन दिवशी जीवनात अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता आहे. राहूमुळे अनारोग्य व गैरसमज यांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात काही अनुकुल घटना घडतील; पण उत्तरार्धात- विशेष करून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात - तो सर्व प्रकारे प्रतिकुल होईल. त्यामुळे सरळ मार्गात अडथळे निर्माण होणे, मतभेद, भांडणे होणे, असे काही घडू शकेल. जपा. शुक्र ग्रह केवळ महिन्याच्या पहिल्या सप्ताहातच अनुकुल होईल. नंतर मात्र दु:ख व मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. रवि महिन्याचा पूर्ण काळ प्रतिकुल असून मनस्ताप, शारीरिक त्रास, अनारोग्य, भय, भांडणे, जीवनसाथी वा संततीचे आजार अशापैकी घटनांमुळे नैराश्य येने संभवते. जपा. अध्यात्म, समाजकार्य अशा क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या या राशीच्या मंडळींना गुरु ग्रह अनुकुल होईल व पण कौटुंबिक सुखाचे दृष्टीने तो प्रतिकुल असाच असेल. हर्षलमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण होईल; तसेच मित्रांशी वाद, भांडणे होणेही संभवते. जपा. नेपच्यून मानसिकरोगतज्द्न्य, द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल होईल. या राशीच्या इतर नोकरी-व्यवसाय करणाऱ्या मंडळींना तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. जपा

(३) मिथुन - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार असून त्यांच्यामुळे दु:ख,भांडणे, अनारोग्य, चिंता, जीवनसाथी व संततीचे आजार व अन्य समस्या त्रस्त करतील. विशेष करून अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार, अशापैकी कसला तरी आजार बळावण्याची शक्यता दिसते.त्यातच स्वभाव लहरी व विक्षिप्त होणे संभवते. त्यामुळे नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, भांडणे होतीलसे दिसते. जपा. या गोष्टी सांभाळल्यात तर बाकी ग्रहमान अनुकुल होईल. मंगळ-गुरु शुभ योगामुळे धैर्य, हिंमत, कर्तबगारी, महत्त्वाकांक्षा वाढेल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. काहींना प्रवासयोग येतील. काहींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे; पण त्यांनी आळस झटकून मनापासून अध्ययन केले पाहिजे. पंचम स्थानी असलेला शनि आळस, नैराश्य निर्माण करण्याची शक्यता आहे. दिनांक १५-१६ हे दोन दिवस मन अधिक अस्वस्थ, बेचैन राहील. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी आर्थिक हितसंबंध आहे त्यांना अधिक अर्थलाभ होईल. कोणतेही बौद्धिक चिकित्सक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना प्रगती, यश व अर्थलाभ या दृष्टींनी या महिन्याचा काळ अनुकुल होईल. या महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना व्यावसायिक प्रगती साधणे शक्य होईल व त्यातून अर्थलाभही होईल. काहींना गुरुकृपा, थोरकृपा प्राप्त होईल व काहींना कीर्ती, प्रसिद्धी मिळेल. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात विशेष

रस आहे, त्यांना उपासनेत अपेक्षित प्रगती साधने शक्य होईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशप्रवासाचे योग येतील. एकंदरीत पाहता, या राशीच्या मंडळींनी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले तरच अनुकुल ग्रहांमुळे सहज मिळणाऱ्या विविध गोष्टींचा आनंद व सुखसमाधान अनुभवणे शक्य होईल.श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ-शनि पूर्णपणे व रवि- बुध महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे या राशीच्या काही मंडळींना राहत्या जागेसंबंधीच्या तर काहींना स्थावरसंबंधीच्या समस्या त्रस्त करतील. गृहसौख्यातही विविध कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. मिळावयाच्या आर्थिक लाभात अडथळे, विलंब, घोटाळे, नुकसान अशापैकी काही होणे शक्य दिसते. पण अनपेक्षित येऊन पडणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या मात्र पार पाडावयाच्या कशा याची चिंता निर्माण होईल. काहींना आवश्यक आर्थिक प्राप्ती मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील व अशा शारीरिक मानसिक त्रासामुळे काहींना अनारोग्यास सामोरे जावे लागेल. शारीरिक उष्णता भडकून काहींना डोळे, घसा, दाढा यांचे दुखणे सहन करावे लागेल. नोकरी-व्यवसायास या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. विशेष करून शिक्षणक्षेत्र, कोणतेही बौद्धिक क्षेत्र, शास्त्रीय संशोधन क्षेत्र व दलाली, कमिशन अशापैकी कार्यक्षेत्र असणाऱ्या या राशीच्या मंडळींना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहींना दूरच्या वा परदेशप्रवासाचे योग येतील. पण जलप्रवास शक्यतो टाळा. या राशीच्या विद्यार्थ्यांनी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखले तरच ते शैक्षणिक प्रगती करू शकतील. दांपत्यजीवनात या महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या मंडळींना नैराश्य, अनारोग्य, मतभेद, वाद यांमुळे सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाचे बावन्न श्लोकी गुरुचरित्र दररोज, नियमितपणे वाचन केल्यास सुखशांती मिळू शकेल.

**(५) सिंह-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. केवळ शनि, गुरु व महिन्याच्या उत्तरार्धात रवि, बुध व शुक्र अनुकुल होणार असल्याने या महिन्याचा काळ सुसह्य होईल. मन स्थिर व शांत ठेवून शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखू शकलात तरच महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होणाऱ्या काळाचा लाभ उठविणे शक्य होईल. अकारण श्रम, दगदग करू नका. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घाला, नपेक्षा हातून नको ते घडेल व पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. शनि-शुक्र शुभ योगामुळे बौद्धिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ लाभदायक होईल. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखणे आवश्यक आहे. मंगळ-गुरु शुभ योगामुळे यांत्रिकतांत्रिक उद्योग-

व्यवसाय असणारांना, कलाकारांना व चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात ब गृहसौख्यात बाधा येणे संभवते. विशेष करून एखादी भावंडविषयक समस्या अस्वस्थ करीलसे दिसते. या राशीच्या युवकांना नवी नोकरी किंवा अपेक्षित कार्यक्षेत्र मिळू शकेल. त्यासाठी महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल, नोकरीत मनोनुकुल घटना घडतील व विरोधकांवर मात कराल व सुखसमाधान लाभेल. नेपच्यूनमुळे दाम्पत्यजीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. तसेच घरीदारी अत्यंत सावधानतेने आचरण करावे. अपघातभय आहे. जपा.

**(६) कन्या-** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही बाब ध्यानात ठेवूनच मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेला मंगळ पूर्णपणे प्रतिकुल व अशुभ असून तो सतत या राशीच्या मंडळींचे मन अस्वस्थ ठेवील. तसेच गैरसमजुती, मानहानी अशापैकी कारणांनी असह्य त्रास होणे संभवते. . या राशीच्या पुरुषवर्गाला स्त्री-समाजाकडून मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच वाढता खर्च, अनपेक्षित उद्भवणारे खर्च यांमुळे काहींना नको हे जीवन असे वाटण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या उलट या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरुमुळे या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशांना अनपेक्षित धनलाभ होणेही शक्य आहे. शनिमुळे व महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे अनिष्ट घटना घडून कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा उत्पन्न होणे शक्य दिसते. तसेच गैरसमजाने नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. जपा. शुक्रामुळे महिन्याचा प्रथम सप्ताह अनुकुल होईल; पण नंतरचा सर्व काळ तो प्रतिकुलच असेल. शरीर व मन अशक्त झाल्यासारखे वाटून या राशीच्या काहींना सतत आपणांस काहीतरी आजार झाल्याची भावना होईल. त्यासाठी काल्पनिक चिंता करणे सोडून द्या. या काळात जीवनसाथीकडून लहरी व विक्षिप्त आचरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दांपत्यजीवनात मतभेद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी.तसेच ज्यांची कोर्टप्रकरणे असतील त्यानी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा पदरी अपयशच पडण्याची दाट शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर हनुमानाची उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

**(७) तुळा-** या राशीच्या मंडळींचा शनिच्या साडेसातीचा काळ आहे. साडेसातीचा १/३ भाग संपलेला आहे. सध्या या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्यात शनि, राहू, केतु हे

तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि व काही प्रमाणात बुध प्रतिकुल असणार आहेत. या महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या मंडळींना आरोग्य व नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होईल.काहींना बढती मिळेल, तर काहींना मानाचे स्थान प्राप्त होईल. पण छुप्या शत्रंपासून सावध राहा. या राशीतील शनिमुळे स्वत:चे व जीवनसाथीचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतीलसे दिसते.त्यामुळे आधीच भावनाशील व हळवे झालेल्यामनाला नैराश्य येईल. अशा परिस्थितीत काहींना दूरगावी प्रवासाचे योग येतील.कुटुंबात काहीही कारणाने भांडणे, कलह निर्माण होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे काहींच्या कौटुंबिक जीवनात काही मंडळी स्थलांतर करण्याची शक्यता दिसते.आर्थिक चणचण वा अर्थप्रप्तीत अडथळे निर्माण होतील. अशा प्ररिस्थितीत मन व बुद्धीवर ताबा ठेवून निराश न होता प्राप्त परिस्थितीशी मुकाबला करण्याची शक्ती प्राप्त होईल. त्यासाठी श्रद्धेने हनुमानाची उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. नोकरी-व्यवसायास महिन्याचा पूर्वार्धच पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे जे काही साध्य करावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. सामान्य नोकरदार मंडळींना कष्टपरिश्रमानेच अपेक्षित अर्थलाभ प्राप्त होईल. या राशीच्या काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. पण मित्रांशी वितुष्ट येणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या काही मंडळींकडून "वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे आचरण होणे संभवते. पण त्यामुळे फ़सगतच होईल. जपा. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे, त्यांना अध्यात्मिक उपासनेत प्रगती होण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील वा संपन्न होतील. नवे स्नेहसंबंध प्रस्थापित होतील. त्यामुळे बरे वाटेल.

**(८) वृश्चिक-** या राशीच्या मंडळींना गेल्या महिन्यापासून शनी ग्रहाची साडेसाती सुरू झाली आहे. त्यामुळे घाबरून न जाता व निराश न होता अत्यंत सावधानतेने विचारपूर्वक सर्व व्यवहार करणे आवश्यक होईल. मनस्ताप देणाऱ्या व मानहानी होण्याऱ्या घटना घडतील. जपा. असह्य मनस्तापामुळे अनारोग्य होणे संभवते. विशेष करून वातविकार बळावतील. काहींना डोळ्याच्या दुखण्याचा त्रास सहन करावा लागेल. वाढता खर्च व आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणे अशक्य होईल. त्यामुळे आप्तेष्टात वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळींना शेतीवाडीपासून अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात कुटुंबात मतभेद, वाद होतील; पण शुक्रामुळे परिस्थिती अटोक्यात राहील व गृहसौख्य व ऐषाराम मिळेल. या राशीच्या उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन क्षेत्र

असणारांना प्रगती, यश व अर्थलाभ या सर्व दृष्टींनी काळ अनुकुल होईल.नोकरी-यवसायात कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी

येतील वा खळबळजनक घटना घडतील. पण गुरु ग्रह पूरक असल्याने फ़ारशी चिंता करावी लागणार नाही. या राशीच्या कलाकारांना व प्रेमिकांना प्रगती व सुख या दृष्टीने काळ अनुकुल होईल.

**(९) धनु-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे तर बुध व हर्षल हे दोन ग्रह काही प्रमाणात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, नियोजित कार्यात अडथळे, वाढता खर्च, फ़सवणूक, आप्तेष्ट भांडणे अशापैकी काही प्रकारचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. बुधामुळे बुद्धी चंचल राहील; पण हा बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात थोडा अर्थलाभही देऊ शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे कशीही परिस्थिती असली तरी मनाला सुखस्वास्थ्य लाभणार नाही. सतत आपल्या मनाविरुद्धच सर्व काही घडत आहे अशी भावना होईल. वास्तुसुख लाभत नाही. मन अत्यंत भावनाशील झाल्यामुळे असे घडण्याची शक्यता आहे. पण नेपच्यूनमुळे अध्यात्म, उपासना अशा गोष्टीत रस असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. असे असले तरी गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे अथवा परदेशगमनाचे योग संभवतात. महिन्याच्या प्रथम सप्ताहात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या काही भाग्यवंतांना भूमिलाभ होणेही संभवते. या राशीच्या कलाकार,यांत्रिकतांत्रिक व्यावसायिक, वकिलीसारखे बौद्धिक चिकित्सक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या भाग्यसथानी असलेल्या मंगळामुळे शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास व मानहानी होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असून मन व बुद्धी स्थिर राखून मनापासून अध्ययन केल्यास अपेक्षित प्रगती व यश साधणे सहज शक्य होईल. या राशीच्या लाभस्थानी उच्च राशीत असलेला शनि व्यावसायिक दृष्ट्या अनुकुल असला तरी संततिसुखात थोडी बाधा आणू शकेल. जपा.

**(१०) मकर-** या राशीच्या मंडळींना तुलनात्मक दृष्ट्या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होणार असल्यामुळे त्यांनी जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात ग्रहमान बर्‍याच प्रमाणात प्रतिकुल होत असल्यामुळे मन व बुद्धी संयमित राखून सतत सावधानतेने आचरण करावे. लागेल; तरच शारीरिक-मानसिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. रक्तदाब व हृदयविकार असणारांना तर विशेषच काळजी घ्यावी लागेल. या राशीच्या काही मंडळींना पोटविकार त्रस्त करतील; तर काहींना मूळव्याधीसारखे उष्णताविकार त्रस्त करतील. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेवाईक मंडळीपैकी कोणाचा

त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. उच्च बौद्धिक व चिकित्सक शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरीत सहज वाममार्गधन मिळण्याची शक्यता असली तरी तो मोह टाळाच. या राशीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीत काहीही कारणाने अडथळे येणार नाहीत याची काळजी घ्यावी. अपघातभय आहेच. जपा. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने आर्थिक लाभ होतील; पण नेपचूनमुळे आर्थिक लाभ हाती पडण्यात अडथळे, विलंब निर्माण होण्याची शक्यता दिसते. मन स्थिर, शांत ठेवा व बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या.

**(११) कुंभ-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल व यशदायक असून महिन्याच्या पूर्वार्धातच जे काही साध्य करावयाचे ते साध्य करण्याचा प्रयत्न करा. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असण्याची शक्यता दिसते. तसेच मानसिक संवेदनाही चटकन बदलतात. त्यामुळे मनासारखे थोडेही घडले नाही तर लगेच गहरे नैराश्य येते. त्यासाठीच महिन्याचा पूर्वार्ध अधिक महत्त्वाचा आहे. शिवाय या राशीच्या मंडळींची विचारशक्तीही अत्यंत अस्थिर झाली असल्यास हातून योग्य ते घडणे अशक्य होईल. जपा. जिभेला लगाम घाला. मते व्यक्त करू नका. या गोष्टी सांभाळूनच महिन्याच्या पूर्वार्धाचा लाभ उठवा. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध-शुक्र-गुरु व काही प्रमाणात शनि हे ग्रह सर्वतोपरी अनुकुल असल्याने नोकरी-व्यवसायात अपेक्षित प्रगती, यश लाभणे शक्य होईल. या राशीच्या काही भाग्यवंतांना बढती, उच्च पद वा मानसन्मान प्राप्त होणेही शक्य आहे. व्यापार-व्यवसायात वाढ होईल. तसेच अन्य लाभही होतील. मात्र वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न अंगाशी येईल, हे ध्यानात ठेवूनच योग्य ते आचरण करा. या राशीच्या लेखकवर्गाला त्यांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल होईल. काहींना प्रवासाचे योग येतील. काहीही कारणाने संततिसुख लाभणे अशक्य होईल. नवे परिचय होतील व त्यातूनच नव्या मैत्राचा आरंभ होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यवसाय असेल त्यांनी गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या मंडळींना भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. .जपा.तसेच दाम्पत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य,दोघांतील मतभेद, वाद,भांडणे यांमुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान मिळणे कठिण होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र अनारोग्य, मानहानी, मनाविरुद्ध घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा.

**(१२) मीन-** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा संपूर्ण काळ अतिशय अनुकुल आहे. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. हाती घेतलेल्या कार्यात अपेक्षित यश मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना बढती,मानाचे पद असे काही मिळू शकेल.व्यापार-व्यवसायात प्रगती, वाढ व आर्थिक लाभ होतील. थोरामोठ्यांच्या ओळखीतून विविध प्रकारचे लाभ होतील. त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण मन व बुद्धी अत्यंत स्थिर व शांत राखणे आवश्यक होईल. " आपल्याला सर्व समजते, कळते; कोणी उपदेश करण्याची गरज नाही " अशा पद्धतीचे आचरण प्रगतीत अडथळे निर्माण करील .जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील व अर्थप्राप्तीही होईल. मात्र शनि-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मनाविरुद्ध घटना घडतील व त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लाग्ल. त्यातूनच शारीरिक आरोग्य बिघडेल. सतत इजा होणे, उष्णतेचे फ़ोड येणे, ताप येणे, रक्तविकार बळावणे, अपप्रचाराच्या त्रासाने हृदयविकार बळावणे अशापैकी एखाद्या आजाराला सामोरे जावे लागेल. जपा.

=====00000=====